सिध्दीकि प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** सिडको

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0516 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/08/2023 22:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिनांक पासून):** 26/07/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/07/2023
   **Time From (वेळेपासून):** 19:24 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 19:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/08/2023 **Time (वेळ):** 21:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 053

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/08/2023 21:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** टिव्ही सेंटर जवळील एम्स,हस्पीटल च्या डाव्या बाजुस,औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अनिस रहिम शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एन-6 जी 27/3 ,संभाजी कलनी सिडको,औरंगाबाद,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एन-6 जी 27/3 ,संभाजी कलनी सिडको,औरंगाबाद,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पवन परिहार | | | 1. सहायक नगर रचानाकर,मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1लाख रुपये ज्यात 500/रु दराच्या 200भारतीय चलनी नोटा (तक्रारदार यांच्याकडुन हस्तगत) | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 07/08/2023

मी अनिस रहिम शेख, वय 38 वर्ष, व्यवसाय- खाजगी नोकरी, रा. एन-6 जी 27/3 संभाजी कॉलनी सिडको, औरंगाबाद मो.नं. 8983111110.

मी वरील प्रमाणे असुन, दिनांक 26/07/2023 रोजी समक्ष लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे माझे मालक श्री. गणेश भिमराव कोळकर यांचेसह हजर येऊन स्वत:चे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली होती की, मी समर्थ इन्फ्रा फर्म मध्ये गणेश भिमराव कोळकर यांचे सरकारी निमसरकारी कार्यालयाशी संबंधीत कामकाज पाहतो. समर्थ इन्फ्रा ही बांधकाम कन्सट्रक्शन संदर्भातील व्यवसायीक कंपनी असुन मला सदर कंपनीकडुन मिळालेल्या मासिक पगारातुन मी उपजिवीका भागवुन उदरनिर्वाह करतो.

समर्थ इन्फ्रा फर्मचे माझे मालक गणेश भिमराव कोळकर यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे समर्थ इन्फ्रा या फर्मच्या वतीने श्री. गणेश बबनराव बागल यांचेकडुन मौजे चिकलठाणा शेत गट नं.377 मधील 17,100 चौरस मीटर ही जमीन विकसनासाठी घेतलेली असल्याने विकसन करार नाम्याचा दस्त अभिनिर्णय करण्यासाठी मालक गणेश भिमराव कोळकर यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे समर्थ इन्फ्रा च्या सर्व भागीदारासह विकसन करारनामा मुल्यांकन मंजुरीसाठी प्रकरण दि.03/07/2023 रोजी अभिनिर्णय प्रकरण क्र.106/2023 दाखल केले आहे. सदर विकसन करारनाम्याचे शासकीय कामकाज पाहण्यासाठी मालक गणेश कोळकर यांनी मला दि.01/07/2023 रोजी अधिकार पत्र दिलेले आहे.

सदरचे प्रकरण मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथील सहायक नगर रचनाकार श्री. पवन परिहार यांचेकडे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी प्रलंबीत आहे. त्यांना मी व माझे मालक श्री. गणेश भिमराव कोळकर असे वारंवार भेटुन आमचे वरील प्रकरणात काय कार्यवाही झाली याची विचारणा करत होतो. परंतू पवन परिहार यांनी सदर प्रकरणात आम्हाला मुल्यांकन जास्त येईल ते मुल्यांकन कमी करणे हे माझ्या हातात असुन आपण मला वैयक्तीक त्या कामाचा मोबदला रक्कम 3 लाख रुपये जो पर्यंत मला मिळत नाही तो पर्यंत मी तुमचे प्रकरण मुल्यांकन करुन पुढे पाठवणार नाही. ते काम माझ्याच हातात आहे. मला पैसे तर दयावेच लागतील नाही तर ते काम होणार नाही. तुम्हाला काय करायचे ते करा अशी अरेरावीची भाषा केली.

परंतू मी आणि मालक गणेश कोळकर असे सातत्याने पवन परिहार यांना वरील विकसन करारनाम्याचे शासकीय मुल्यांकन निश्चित करुन, मुद्रांक शुल्क आकारणी करीता अभिनिर्णय कक्षाकडे फाईल पुढे पाठविण्याची विनंती करत होतो. परंतू पवन परिहार साहेब हे त्यांना आम्ही पैसे देत नसल्याने सातत्याने त्यांचे कक्षाचे बाहेर उभा करुन वारंवार त्यांचे कार्यालयात चक्कर मारायला लावत आहेत. पवन परिहार हे माझे मालक गणेश कोळकर यांना अरेरावीची भाषा बोलत असल्याने माझे मालक गणेश कोळकर हे पवन परिहार यांचेवर चिडले असल्याने पवन परिहार हे माझे मालक गणेश कोळकर यांचेकडे पैशाची मागणी न करता माझ्याकडेच पैशाची मागणी करत आहेत.

तरी दिनांक 26/07/2023 रोजी पवन परिहार यांना मी व माझे मालक गणेश कोळकर यांनी त्यांचे कार्यालयात जाऊन विचारणा केली असता त्यांनी आमचे वरील फाईल प्रकरणाची सध्यास्थिती न सांगता हाताने इशारा करुन कार्यालय सुटल्यावर भेटू असे सांगितले.

त्यानंतर पवन परिहार, सहायक नगर रचनाकार, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद हे त्यांचे कार्यालय



Scanned with CamScanner

सुटल्यानंतर मला स्वत: आमचे वरील कामासाठी भेटणार आहेत. त्यावेळी पवन परिहार यांनी आमचे चिकलठाणा शेत गट नं.377 मधील 17,100 चौरस मीटर जमीन विकसन करारनाम्याचे शासकीय मुल्यांकन निश्चित करुन, मुद्रांक शुल्क आकारणी करीता अभिनिर्णय कक्षाकडे फाईल पुढे पाठविण्यासाठी 3 लाख रुपयाची स्वत: मागणी करुन ती रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथील सहायक नगर रचनाकार, श्री. पवन परिहार यांना 3 लाख रुपये लाच देण्याची माझे मालक गणेश कोळकर यांची इच्छा नाही तसेच माझीही 3 लाख देण्याची इच्छा नाही. पवन परिहार, यांचेत व माझेत पैशाच्या देण्याघेण्याचा उसनवारीचा व्यवहार नाही. वैर दुष्मनी नाही. पवन परिहार, हे मला त्यांचे कार्यालय सुटल्यावर बोलवितील त्यावेळस मी त्यांची भेट घेणार आहे. त्यावेळी कारवाई करावी हि विनंती आहे अशी तक्रार दोन पंचासमक्ष ॲन्टी करप्शनचे क्षीरसागर साहेब यांचेकडे दिली.

मी वरील प्रमाणे दिलेल्या तक्रारीनंतर क्षीरसागर साहेबांनी मला, दोन्ही पंचांना, सापळा पथकातील सदस्यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. त्यानंतर थोडयाच वेळात मला पवन परिहार यांचा फोन आला व त्यांनी मला टि.व्ही.सेंटर औरंगाबाद येथे तात्काळ बोलविले. त्याप्रमाणे क्षीरसागर साहेब, मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे काहीजन खाजगी दुचाकीवर मी व माझे मालक गणेश कोळकर यांचे खाजगी चारचाकी वाहनासह अंदाजे सव्वा सातच्या सुमारास टि.व्ही.सेंटर, औरंगाबाद जवळ सुरक्षीत ठिकाणी पोहोचलो. तेवढयात पवन परिहार साहेब यांचा मला फोन आला त्यावेळी माझ्या फोनच्या स्पिकरचा आवाज मोठा करुन सदरवेळचे माझे व पवन परिहार यांचे बोलणे व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून रेकॉर्ड करण्यात आले. त्यावेळी पवन परिहार यांनी टि.व्ही.सेंटर भागातील एम्स हॉस्पीटल जवळ येण्याचे सांगितल्याने, मी तसाच चालू असलेले व्हाईस रेकॉर्डर घेऊन पंच क्र.1 यांना घेऊन एम्स हॉस्पीटल जवळ गेलो तेथून पवन परिहार यांना फोन केला त्यावेळी त्यांनी एम्स हॉस्पीटलच्या बाजुला बोलविले त्याठिकाणी मी पंच क्र.1 यांचेसह गेलो तेथे पवन परिहार हे त्यांचेकडील चारचाकी पांढऱ्या रंगाची नेक्झॉन गाडीसह हजर होते त्यांची आम्ही भेट घेतली त्यावेळी पवन परिहार यांनी, माझे मालक गणेश कोळकर यांचे चिकलठाणा शेत गट नं.377 मधील जमीन विकसन करारनाम्याचे शासकीय मुल्यांकन निश्चित करुन, त्यात त्यांना मुल्यांकन कमी जास्त करण्याचा अधिकार आहे असे सांगुन, आमचे मालक गणेश कोळकर यांचे वर नमुद कामासंबंधाने चर्चा केली. व मुद्रांक शुल्क आकारणी करीता अभिनिर्णय कक्षाकडे फाईल पुढे पाठविण्यासाठी मागील मागणी केलेल्या 3 लाखापैकी फक्त त्यांचे टेबलचे वेगळे माझे मालक गणेश कोळकर यांना दिड एकच्या आसपास सांगा.. दिड एकच्या आसपास सांगा.. दिड एकच्या आसपास सांगा.. असे तीन वेळा म्हणुन दिड लाख रुपये मागितले. त्यावेळी मी त्यांना मालक दिड लाख रुपये देत नाहीत एक लाखापर्यंत मी कन्व्हेंन्स करतो असे बोललो त्यानंतर फाईलच कय नाही पुढं पाहुन घेऊ त्याच कई प्रॉब्लेम नाही.. .. जमतंय तेवढं बरोबर पहा असे म्हणुन एक लाख रुपयामध्ये वाढ करुन दीड लाख रुपयाची बरोबरी करा अशी पैशाची मागणी केली. त्यावेळी माझ्याजवळ मालकाने 25 हजार रुपये दिल्याचे सांगितले ते पैसे पवन परिहार यांनी मला त्यांचे गाडीत बसवुन माझ्याकडुन 25 हजार रुपये घेतले. व वरील मागणी केलेल्या दीड लाखापैकी तडजोड करुन ठरलेले 1 लाख रुपये हे पवन परिहार हे दि.27/07/2023 रोजी त्यांचे कार्यालय सुटल्यावर कार्यालयाचे बाहेरच घेणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.

त्याप्रमाणे मी दिनांक 27/07/2023 रोजी मला पवन परिहार साहेबांनी कार्यालयीन वेळेनंतर भेटण्यास बोलावले होते परंतु पवन परिहार साहेब यांचे कार्यालयात माझे इतर कामानिमीत्त गेलो त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, त्यांचेकडे खूप काम आहे आपण गणेश कोळकर यांचे कामाकरीता सोमवारी (दि.31/07/2023) निवांत भेटू असे त्यांनी सांगितले. सदरची घटना ही मी क्षीरसागर साहेबांना सांगुन दिनांक 31/07/2023 रोजी सोमवारी सापळा कारवाई करण्याची विनंती केली.

त्यानंतर सोमवार दि. 31/07/2023 रोजी पवन परिहार साहेबांनी मला सोमवारी भेटण्याचे सांगितल्यावरुन मी समक्ष ॲन्टी करप्शन कार्यालय, औरंगाबाद येथे क्षीरसागर साहेबांची भेट घेऊन सापळा कारवाई करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे क्षीरसागर साहेबांनी पवन परिहार यांना देण्यासाठीची लाचेची रक्कम सापळा कारवाई करीता हजर करणे करीता सांगितली. त्याप्रमाणे मी माझ्याकडे मालक गणेश कोळकर यांनी दिलेल्या 500 रु दराच्या 200 नोटा एकुण 1 लाख रुपये क्षीरसागर साहेबांकडे हजर केले. त्यानंतर मला, दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्यांना सुचना देऊन मार्गदर्शन करुन ॲथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रात्यक्षिक दाखवुन त्या नोटांना आम्हा सर्वासमक्ष ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्या अंगातील उजव्या पॅन्टच्या खिशात ठेवुन माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र.1 यांना सोबत देऊन, पवन परिहार, सहायक नगर रचनाकार यांना भेटण्यासाठी, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे माझ्याकडील खाजगी मोटार सायकलने दिनांक 31/07/2023 साडे पाच



Scanned with CamScanner

वाजता पाठविले.
त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे गेलो. तेथे मालक गणेश कोळकर हे त्यांचे मित्रांसह हजर होते. मी पवन परिहार साहेब यांचे कार्यालयात पंचासह गेलो तेथे पवन परिहार साहेब हे मला त्यांचे खुर्चीत दिसले नाहीत म्हणुन मी पवन परिहार साहेब यांचे खुर्चीच्या बाजुला खुर्चीत नेहमी काम करणारा व्यक्ती मला नाव माहीत नाही त्यांना पवन परिहार साहेब हे आले नाहीत का असे विचारले असता त्यांनी पवन परिहार साहेब हे मेडीकल रजेवर असल्याचे सांगुन पवन परिहार साहेबांचा सकाळ पासुन फोन लागत नसल्याचे त्या कार्यालयातील व्यक्तीने सांगितले. त्यानंतर मी माझे फोनवरुन पवन परिहार साहेबांचा मोबाईल क्र. 9767972087 वर माझ्या वरील मोबाईल नंबरवरुन फोन केला व फोनचा आवाज मोठा करुन ऐकले असता सदरचा नंबर इनव्हॅलीड असल्याचे दिसुन आले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सुरक्षित ठिकाणी परत आलोत. तेथे क्षीरसागर साहेबांनी माझ्याकडील पावडर लावलेल्या नोटा व व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन दोन पंचासमक्ष त्यांचे ताब्यात घेऊन त्यातील माझे व पवन परिहार साहेबांच्या कार्यालयातील व्यक्तीचे संभाषण आम्हा सर्वासमक्ष ऐकले.
तरी पवन परिहार, सहायक नगर रचानाकर, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी आमच्या समर्थ इन्फ्रा फर्मच्या वतीने चिकलठाणा शेत गट नं. 377 मधील जमीन विकसन करारनाम्याचे शासकीय मुल्यांकन निश्चित करुन, मुद्रांक शुल्क आकारणी करीता माझ्याकडुन दिनांक 26/07/2023 रोजी लाचमागणीवेळी 25 हजार रुपये परस्पर नगदी घेऊन पुन्हा दिड एकच्या आसपास सांगा असे तीन वेळा म्हणुन दिड लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी माझे मालक ऐवढे पैसे देत नाहीत असे सांगितले तेंव्हा 1 लाख रुपये स्विकारण्याचे मान्य केले. परंतू ..जमतंय तेवढं बरोबर पहा.. असे म्हणुन शक्यतो दीड लाख रुपये घेऊन या असे सांगितले.
टिप -(CCTNS प्रणालीची अक्षरांची क्षमता 8000 असल्याने उर्वरीत फिर्याद स्वतंत्र पान क्र 2 वर जोडण्यात आली आहे )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
ASHOK SHALIKRAM AWCHAR
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** PSI
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

त्याप्रमाणे मी दिनांक 27/07/2023 रोजी मला पवन परिहार साहेबांनी कार्यालयीन वेळेनंतर भेटण्यास बोलावले होते परंतु त्या दिवशी पवन परिहार साहेब यांचे कार्यालयात माझे इतर कामानिमीत्त गेलो त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, त्यांचेकडे खूप काम आहे आपण गणेश कोळकर यांचे कामाकरीता सोमवारी (दि.31/07/2023) निवांत भेटू असे त्यांनी सांगितले. सदरची घटना ही मी क्षीरसागर साहेबांना सांगुन दिनांक 31/07/2023 रोजी सोमवारी सापळा कारवाई करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे मी दिनांक 31/07/2023 रोजी त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेऊन, पंचासह गेलो. परंतू पवन परिहार यांनी सुटटी घेऊन मोबाईल बंद केलेला आहे. दि.31/07/2023 पासुन ते आजपर्यंत पवन परिहार साहेब हे त्यांचे कार्यालयात हजर आलेले नाहीत. आज सुध्दा मी पवन परिहार साहेबांची वाट पाहिली, परंतू पवन परिहार हे त्यांचे कार्यालयात हजर येत नाहीत त्यामुळे माझे सांगणे की, माझे मालक गणेश कोळकर यांचे सोबत नेहमी बरेच लोक असतात त्या लोकांचा मला परिचय नाही. त्यामुळे आतापर्यंत मी करत असलेल्या कारवाई बाबत त्यातीलच कोणीतरी माझी व मालक यांची सापळा कारवाई बाबतची चर्चा ऐकुण त्यांच्यातील कोणाकडुन तरी पवन परिहार यांना मी करत असलेल्या कारवाईची कुणकुण लागली असुन, त्यामुळे पवन परिहार यांना माझ्यावर संशय आल्याने ते माझ्याकडुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेण्यास टाळाटाळ करुन त्यांचे कार्यालयात हजर न राहता मोबाईल बंद करुन निघुन गेले आहेत.

त्यामुळे पवन परिहार साहेब यांनी वर प्रमाणे वरील कामासाठी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम आता ते माझ्याकडुन स्विकारणार नाहीत याची मला आता खात्री झाली आहे. पवन परिहार, सहायक नगर रचनाकार, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी वर प्रमाणे माझे मालक गणेश कोळकर यांच्या शासकीय काम करीता रुपये 1,50,000/- रुपये माझ्याकडे पंचासमक्ष लाचेची मागणी केली म्हणुन पवन परिहार, सहायक नगर रचनाकार यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरील फिर्याद ही संगणकावर माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली सही.

Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

07/08/2023

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SAMBHAJI BAPURAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362SBPM800



Scanned with CamScanner